International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राची भूमिका

**डॉ. अनंतराव जुलालराव पवार**

सहाय्यक प्राध्यापक तथा, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, स्व. नारायणराव जानराव देशमुख वरीष्ठ महाविद्यालय, अमडापुर ता. चिखली जि. बुलढाणा.

**सारांश :**

भारतीय अर्थव्यवस्थेत वर्तमानकालीन परिस्थितीत सेवा क्षेत्राचे महत्व वाढतच चालले आहे. भारतातील एकुण प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीच्या दोन तृतीयांश प्रवाह आणि एकुण निर्यातीच्या सुमारे 38 टक्के आहे. भारतातील सेवा क्षेत्राचा वाटा सद्यस्थितीमध्ये 33 पैकी 15 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये एकुण राज्य मुल्यवर्धित मुल्याच्या 50 टक्क्याहुन अधिक असुन हा वाटा दिल्ली आणि चंदीगडमध्ये 80 टक्क्याहुन अधिक आहे. सेवा क्षेत्राने गेल्या दोन दशकामध्ये झपाट्याने वाढ करून महत्तपुर्ण योगदान दिले आहे. 1996-2002 या कालावधीत 68.3%, दरम्यान 2001-08 या कालावधीत 70.2% इतके उच्च योगदान दिले आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये भारतातील सेवा क्षेत्राच्या संदर्भात विस्तृत अध्ययन करून भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राची भूमिका स्पष्ट केली आहे.

**बीज शब्द -:** सेवा क्षेत्र, स्थुल देशांतर्गत उत्पादन, आर्थिक वृध्दी, दळणवळण, उदारीकरण संप्रेषण तंत्रज्ञान.

**प्रस्ताविक :**

भारतीय अर्थव्यवस्थेची जी क्षेत्रीय रचना झालेली आहे त्या रचनेतील तृतिय क्षेत्र म्हणजेच सेवा क्षेत्र होय. सेवा क्षेत्रामध्ये अशाप्रकारच्या आर्थिक कार्याचा समावेश असतो की, जी कार्य वस्तुंचे उत्पादन करत नाही मात्र सेवा क्षेत्र हे वस्तुंच्या उत्पादनासाठी व वितरणासाठी मदत करत असते. उदा.- वाहतुक, व्यापार, दळणवळण, पोस्ट, बँकींग इत्यादी. या व्यतिरिक्त व्यवसायिक, प्रशासकिय, वैयक्तिक सेवा यांचा सुध्दा समावेश सेवा क्षेत्रात होतो. डॉक्टर, वकील, शिक्षक, हॉटेल, इंटरनेट, कॅफे, कॉल सेंटर इत्यादी प्रकारच्या सुध्दा सेवा आहेत. अलिकडच्या वर्षामध्ये सेवा निर्यातीने वस्तुंच्या निर्यातीपेक्षा अधिक समाधानकारक कामगिरी केली असल्याचे दिसुन येते. यामुळे जगातील व्यावसायिक सेवा निर्यातीत

भारताचा वाटा वाढलेला आहे. भारतातील सेवा क्षेत्राची वाढ ही आर्थिक विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाची बाब असुन सेवा क्षेत्राची भारताच्या जी.डी.पी. मध्ये योगदान 60 टक्क्याहुन अधिक असल्याचे दिसुन येते.

- **उद्दीष्टे :**

1. भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राच्या भूमिकेचे अध्ययन करणे.
2. सेवा क्षेत्राचा आर्थिक वृध्दीतील कल तपासणे.
3. सेवा क्षेत्रांच्या गतिमान वृध्दीच्या कारणांचे अध्ययन करणे.

- **नियोजन काळातील क्षेत्रीय वृध्दीदर :**

मागील काही दशकमध्ये भारतीय अर्थव्यवस्था ही अत्यंत वेगाने विकसित होत असुन या विकासाला मुख्यत: सेवा क्षेत्र हे कारणीभूत असल्याचे निदर्शनास येते. खाली दिलेल्या तक्त्यावरून हे दिसुन येते.

**तक्ता क्र. 1 : नियोजन कालावधीत क्षेत्रीय वृध्दीदर (प्रत्येक वर्ष टक्केवारीत)**

| **क्षेत्र** | **2007-08** | **2008-09** | **2009-10** | **2010-11** | **2021-22** |
|---|---|---|---|---|---|
| कृषी क्षेत्र | 5.8 | -0.1 | 0.4 | 6.6 | 19 |
| औद्योगिक क्षेत्र | 9.7 | 4.4 | 8.0 | 7.9 | 28.2 |
| सेवा क्षेत्र | 10.3 | 10.1 | 10.1 | 9.4 | 53.89 |
| एकुण घरेलु उत्पादन | 9.3 | 6.7 | 8.4 | 8.4 | 8.7 |

**स्त्रोत :-** जिम गार्डन आणि पुनम गुप्ता, भारतातील सेवा क्षेत्राची उत्क्रांती.

उपरोक्त तक्त्यातील कल पाहिले असता असे निदर्शनास येते की, 2021-12 या आर्थिक वर्षात कृषी क्षेत्राचा घरेलु उत्पादनामध्ये 19 टक्के इतका वाटा असुन 2010-11 या आर्थिक वर्षाच्या तुलनेत त्यामध्ये सुधारणा झाल्याचे निदर्शनास येते. त्याच प्रमाणे उपरोक्त वर्षामध्ये आपण औद्योगिक क्षेत्रांचा विचार केला असता घरेलु उत्पादनामध्ये आपणास त्याचा वाटा 28.2% इतका एकुण घरेलु उत्पादनामध्ये असल्याचा आपणास दिसुन येतो. सेवा क्षेत्राच्या बाबतीत वाढ ही अतिशय गतिशिलतेने आणि सकारात्मक पद्धतीने 53.89 इतका वृध्दीदर सेवा क्षेत्राचा सकल घरेलु उत्पादनामध्ये आपणास दिसुन

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

येते. भारत हा जरी कृषीप्रधान देश असला तरी सेवा क्षेत्राची वाटचाल ही नेहमीच कृषी क्षेत्राच्या पुढे होत असल्याचे आपणास उपरोक्त अध्ययनावरुन दिसुन येते.

गार्डन आणि गुप्ता यांचा असा युक्तीवाद आहे की, सेवा क्षेत्रातील वाढ ही उद्योग आणि शेतीच्या वाढीपेक्षा कमी चक्रीय आणि अधिक स्थिर होती. त्यांच्या निरीक्षणानुसार नवव्या योजनेत (1997-2002) कृषी आणि औद्योगिक क्षेत्रांच्या बाबतीत कमी-अधिक प्रमाणात आर्थिक मंदी होती, परंतु याच कालावधीत सेवा क्षेत्राच्या बाबतीत वृध्दीदर हा 7.9 टक्के असा उल्लेखनिय होता. 2002-03 नंतरच्या वर्षामध्ये सेवा क्षेत्राच्या विस्ताराला अजुन वेग आला. दहाव्या योजनेच्या कालावधीत (2002-07) सेवांमध्ये वार्षिक 9.3% दराने वाढ झाली. अकराव्या योजनेच्या 2007-08 च्या पहिल्या वर्षात जी.डी.पी. मध्ये 9.3% वाढीचा दर होता, पण जागतिक मंदीनंतर आर्थिक मंदीमुळे 2008-09 मध्ये हा विकासाचा दर 6.7 टक्क्यांने घसरला. सेवा क्षेत्राच्या वाढीमुळेच 2008-09 मध्ये अर्थव्यवस्थेला 6.7% विकास दर गाठण्यात आला. सेवा क्षेत्राने 2009-10 मध्ये 10.1% आणि 2010-11 मध्ये 9.4% वाढ नोंदवली आहे.

- **सेवा क्षेत्राचे आर्थिक वृध्दीतील योगदान :**

**तक्ता क्र. 2 : निरनिराळया क्षेत्रांचा सकल घरेलु उत्पादन वाटा.**

| क्षेत्र | 1951-52 | 1990-91 | 1996-02 | 2008-12 |
|---|---|---|---|---|
| कृषी क्षेत्र | 34.9 | 20.8 | 11.5 | 7.1 |
| औद्योगिक क्षेत्र | 35.5 | 35.2 | 20.2 | 22.7 |
| सेवा क्षेत्र | 29.6 | 41.0 | 68.3 | 70.2 |
| उत्पादन घटकाच्या मुल्यानुसार G.D.P. | 100 | 100 | 100 | 100 |

**स्त्रोत :-** सुनिल जैन आणि टी.एन. निनान, भारतातील घरेलु स्थुल उत्पादनाची वृध्दी.

उपरोक्त तक्त्याच्या अध्ययनावरुन असे निदर्शनास येते की, 1960 आणि 1961 च्या दरम्यान कृषी क्षेत्राचा वाटा हा स्थुल घरेलु उत्पादनाच्या 50% इतका होता. तसेच औद्योगिक क्षेत्राचा वाटा 30% होता. आणि सेवा क्षेत्राचा वाटा हा साधारणमध्ये 20 टक्के होता. तसेच, 1990-91 च्या दरम्यान कृषी क्षेत्राचा स्थुल घरेलु उत्पादनातील वाटा कमी झाला. त्याच वेळी मात्र सेवा क्षेत्राचा वाटा हा 40 टक्के पेक्षा जास्त झाला. पंचवार्षिक योजनेच्या दरम्यान 1991-92 ते 1996-97 ला सेवा क्षेत्राचा वाटा हा स्थुल घरेलु उत्पादनामध्ये 50% इतका झाला. त्यानंतरच्या कालावधीमध्ये 2001-02 पर्यंत सेवा क्षेत्राची स्थुल घरेलु उत्पादनामध्ये 68.3% इतकी वाढ झाली. 2008-09 ते 2011-12 च्या दरम्यान स्थुल घरेलु उत्पादनामध्ये सेवा क्षेत्राचा वाटा हा 70.2% इतक तीव्र गतीने वाढला आहे.

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

**सेवाक्षेत्राच्या गतिमान वृध्दीची कारणमिमांसा :-**

- **तांत्रिक प्रगती :-**

सेवा क्षेत्राच्या वाढीला तांत्रिक प्रगतीमुळे देखील चालना मिळत आहे. ज्याद्वारे तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे नवीन उपक्रम किंवा उत्पादने उदयास येतात. अशा प्रकारच्या तांत्रिक प्रगतीचा भारतातील सेवा क्षेत्राच्या वाढीवर सकारात्मक परिणाम दिसुन येतो. विशेषत: आय.टी. क्षेत्रातील इंटरनेटचा वाढता वापर, दुरसंचार क्षेत्रातील सेल्युलर फोन, सेवांचा विस्तार, क्रेडिट कार्ड आणि ATM चा वापर इत्यादी.

- **उदारीकरणाच्या धोरणाची भूमिका :-**

आर्थिक सुधारणेनंतरच्या कालावधीनंतर औद्योगिक आणि व्यापार धोरण ही अधिक शिथिल करण्यात आली आणि दळणवळण, विमा, वाहतुक, बँकींग इत्यादी क्षेत्रे ही खाजगी सहभागासाठी खुली करण्यात आली. या उदारीकृत धोरणामुळे सेवा क्षेत्राच्या वाढीला अतिशय गतीने चालना मिळाली. सुनिल जैन आणि टी. एन. निनान या अर्थतज्ञांनी असे दाखवुन दिले की, सुधारणेनंतरच्या काळात सेवामध्ये वेगाने वाढ होणारी क्षेत्रे लक्षणीय उदारीकरणाची साक्षीदार आहे. तंत्रज्ञानावर आधारित क्षेत्रामध्ये ही उदा. आय.टी. आणि दळणवळण, सरकारने लादलेल्या मर्यादा, ज्यामध्ये कर, किंवा करेत्तर शुल्क यामध्ये बचत करणे व यापासुन भांडवल निर्मिती करणे आणि या भांडवल निर्मितीपासुन उद्योग संस्थेचा अधिकाधिक विकास करुन देशाच्या उत्पन्नामध्ये अधिक भर टाकणे, परंतु या संदर्भाने आपोआपच दळणवळण सेवा, विमा सेवा, बँकींग सेवा, संगणकीय सेवा इत्यादींला सुध्दा चालना मिळाली. अलिकडच्या वर्षामध्ये जी.डी.पी. मध्ये दळणवळण सेवांचा वाटा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. हे प्रामुख्याने दुरसंचार उदारीकरणामुळे झाले आहे, असे आपणास म्हणावे लागेल. 1999 मध्ये एकुण टेलिफोन कनेक्शनमध्ये खाजगी क्षेत्राचा वाटा केवळ 5% होता. डिसेंबर 2011 पर्यंत हे प्रमाण 86% पर्यंत वाढले. 2004 पासुन वायरलेस कनेक्शनची संख्या वार्षिक 60% या दराने वाढल्याने मोबाईल, टेलिफोनच्या क्षेत्रात एक महत्वपुर्ण क्रांती घडुन आली आहे.

- **मागणी- बाजुला चालना :-**

आर्थिक सुधारणा काळानंतर (1991 नंतर) विशेषत: परदेशी स्त्रोताकडुन मागणी-बाजुला चालना मिळाली आहे. विशेषत: IT/ITES (माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवा) क्षेत्राला जास्तीचा पाठींबा मिळाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे भारतातील अनुकुलीत किमती आणि या किमतीमध्ये मिळणारा फायदा होय. विकसित राष्ट्रातील अनेक कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात भारतीय कंपन्यांना काही सेवा आऊटसोर्स करणे सुरू केले आहे. यामुळे भारतातील सेवांची निर्यात 1992 मधील 4.9 अब्जावरुन 2010-11 मध्ये 132.9 अब्ज इतकी वाढु शकली आहे.

- **माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान :-**

वर्तमानकालीन परिस्थितीमध्ये भारतातील सेवांच्या जलद वाढीत योगदान देणारे महत्वाचे क्षेत्र म्हणजे माहिती आणि

दळणवळण तंत्रज्ञान क्षेत्र होय. आय.सी.टी. मध्ये संगणक (हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर) दुरसंचार आणि ऑप्टो इलेक्ट्रॉनिक्स मायक्रोप्रोसेसर, सेमीकंडक्टर, फायबर ऑप्टीक्समध्ये नवकल्पना यांचा समावेश होतो. एक मजबुत ICT पायाभूत सुविधा जगभरातील माहितीची जलद आणि कार्यक्षम देवाणघेवाण करण्यास सक्षम करते. विविध तंत्रज्ञानातील अलिकडील प्रगती जागतिक स्तरावर प्रभावित करीत आहे. निर्मिती, संपादन, ज्ञानाचा वापर आणि देवाणघेवाण इत्यादी. पणन संशोधन संस्था वितरक इत्यादीमध्ये उत्पादनाचे प्रमाण वाढतांना दिसत आहे, आणि ते भविष्यात अजुनह वाढेल अशा प्रकारची अपेक्षा आहे.

**तक्ता क्र. 3 – IT/ITES क्षेत्रामधील वाढ (टक्क्यामध्ये)**

| **वर्ष** | **औद्योगिक आकार** | **निर्यात बाजार** | **घरगुती बाजार** |
|---|---|---|---|
| 1995-96 | -- | 0.6 | 0.5 |
| 2004-05 | 34.2 | 34.3 | 33.9 |
| 2007-08 | 31.3 | 29.0 | 35.8 |
| 2011-12 | 14.5 | 17.1 | 9.3 |
| 2021-22 | 19.93 | 18.4 | 7.4 |

**स्त्रोत :-** टाटा सर्व्हिसेस लिमीटेड 2003-04

वरील तक्त्याच्या अध्ययनावरुन असे निदर्शनास येते की, 2021-22 मध्ये IT-ITES क्षेत्राच्या बाबतीत औद्योगिक क्षेत्राच्या आकारात 19.93 टक्के एवढी वाढ झाली आहे आणि या वाढीसाठी अलिकडील काळात तंत्रज्ञानात होणारा विकास कारणीभूत आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. IT-ITES च्या निर्यातीच्या बाबतीत साधारणपणे 18.4 टक्के वाढ झाली आहे, आणि या वाढीमुळे आंतरराष्ट्रीय चलन प्राप्ती होणे सुलभ झाले आहे. ज्यामुळे भारतीय गंगाजळीत परकिय चलनाची भर पडुन देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत होईल.

**सारांश :-**

सेवा क्षेत्राने गेल्या दोन दशकामध्ये किंवा या कालावधीमध्ये अतिशय तीव्र गतीने वाढ नोंदविल्याचे दिसुन येते आणि त्यामुळे भारताच्या जी.डी.पी. च्या वाढीमध्ये सेवा क्षेत्राने महत्वपुर्ण योगदान दिल्याचे दिसुन येते. 1996-2002 या कालावधीत 68.3 टक्के तर 2001-08 च्या कालखंडात 63.6 टक्के तर 2008-09 ते 2011-12 या कालावधीत 70.2 टक्के इतके उच्च योगदान जी.डी.पी. मध्ये सेवा क्षेत्राने दिले आहे. म्हणजेच 1991 नंतरच्या म्हणजेच आर्थिक सुधारणेनंतरच्या

काळात सेवा क्षेत्राच्या वाढीचा हा उच्च दर आहे. ज्याने 1990 च्या दशकात जी.डी.पी. दर दरवर्षी सुमारे 6 टक्के आणि या कालावधीत वार्षिक 7.8% दराने वाढवुन दिला आहे. IT क्षेत्राने विशेषत: 1990 पासुन भारतात क्रांती घडवुन आणली आहे. कारण या क्षेत्राने उद्योग व्यवसाय आणि समाजातील मध्यस्थी कमी केली आहे. आय.टी. क्षेत्राने समाजातील व्यक्तींना अधिक माहिती देऊन त्यांना सशक्त केले आहे. ई-गव्हर्नन्स, ई-बँकींग, ई-कॉमर्स इत्यादी कार्यक्रम ग्रामीण विकासासाठी आणि पर्यायाने देशाच्या विकासासाठी पुरक ठरत आहेत. भारताच्या सॉफ्टवेअर आणि सेवा क्षेत्राची निर्यात कामगिरी मागील दशकात तीव्र गतीने विकसित झाली आहे. परिणामस्वरूप सॉफ्टवेअर आणि सेवा क्षेत्राचा जी.डी.पी. मध्ये 2.6% पेक्षा जास्त वाटा तयार झाला आहे, आणि यामुळे निश्चितच भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सेवा क्षेत्र हे महत्वपुर्ण योगदान देत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. Ahluwalia I. J. (2002), Economic reform and Indias development, New Delhi, Oxford University Press.
2. Ramesh Sinh, Indian Economy, Mc Grow Hill Education Pvt. Ltd. Chennai.
3. Economic Survey – 2022-23, New Delhi, Ministry Of Finance Govt.
4. दत्त एव सुंदरम – 2011, भारतीय अर्थव्यवस्था, अर्जुन पब्लिसिंग हाऊस, नवी दिल्ली.
5. आर्थिक समीक्षा – 2022-23, नई दिल्ली, वित्त मंत्रालय, भारत सरकार.
6. आर. बी. आय. हँडबुक.